शनिवार दि.२६ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ५२
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# विरोधकांसाठी लाडक्या बहिणींच पुरेशा

# नाना पटोलेंवर देवेंद्र फडणवीसांचा हल्लाबोल

## उमेदवारी अर्ज दाखल करत सहाव्यांदा मैदानात



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नागपूर (वृत्तसंस्था)**

नागपूरकरांशी मला जास्त बोलण्याची आवश्यकता नाही. कारण नागपूर शहरामध्ये आमचे काम बोलते, असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी मोठे शक्ती प्रदर्शन केले. यावेळी राज्यातील भाजपचे सर्वच मोठे नेते उपस्थित होते. नागपूर येथील जनतेच्या आशीर्वादामुळेच मी राज्यासाठी काम करू शकलो, राज्याचा उपमुख्यमंत्री होऊ शकलो, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

नागपूर आणि विदर्भात परिवर्तन घडवून दाखवले असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. नागपूर शहरातील विकास पाहिला तर बदल दिसून येतो. त्यामुळे माझ्यापेक्षा माझे काम बोलत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. विरोधकांबद्दल बोलायची गरज नाही. मी त्याविषयी बोलणार नाही. त्यांच्यासाठी केवळ आमच्या लाडक्या बहिणी पुरेशा आहे, असे देखील फडणवीस म्हणाले. ज्या लाडक्या बहिणींच्या तोंडाचा घास पळवण्यासाठी सुनील केदार आणि नाना पटोले यांनी नागपूरच्या न्यायालयात केस केली. त्या लाडक्या बहिणीच त्यांना पुरुन उरतील, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

मुलींसाठी मोफत शिक्षण असेल, शेतकऱ्यांसाठी मोफत मोफत बीज असेल, दिन, दलित, गरीब, आदिवासी, शेतकरी सर्वांसाठी आम्ही केलेले काम बोलत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ओबीसी समाजासाठी ४८ जीआर काढणारे महायुतीचे सरकार आहे. मात्र महाविकास आघाडीच्या सरकारचा एक तरी जी आर दाखवावा, असे आव्हान देखील त्यांनी दिले आहे. ओबीसी समाजासाठी आम्ही हॉस्टेल तयार करून दाखवले. मात्र, महाविकास आघाडीचे सरकार एकही हॉस्टेल तयार करू शकले नसल्याचा आरोप त्यांनी केला.नागपूर जिल्ह्यामध्ये तीन उमेदवारी अर्ज दाखल होत असताना आणखी तीन आमदार आमच्या सोबत येणार असून मुंबईतील विधानभवनात नागपूरचा आवाज बुलंद होणार असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला. महाराष्ट्रात पुन्हा एकदा महायुतीचा झेंडा फडकवणार असल्याचा दावा देखील यावेळी फडणवीस यांनी केला.

## ज्ञानतीर्थ-२४ युवक महोत्सवात श्री मधुकरराव बापूराव पाटील खतगावकर महाविद्यालयाचे घवघवीत यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली | गौतम गावंडे**



शंकरनगर येथील श्री मधुकरराव बापूराव पाटील खतगावकर महाविद्यालयाने नुकत्याच झालेल्या ज्ञानतीर्थ -२०२४ या अंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात दोन पारितोषिके पटकावली आहेत. कु. संजना हनणमंतराव मिसे या बी.एससी. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनीने कथाकथन या स्पर्धेत तृतीय पारितोषिक पटकावले तर महाविद्यालयाच्या संघाने शोभायात्रेमध्ये द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. मराठवाड्याची कला व संस्कृती या विषयावरील शोभायात्रेत विद्यार्थ्यांनी त्यांच्या आकर्षक वेशभूषा व कला संस्कृतीच्या मनमोहक प्रदर्शनाने प्रेक्षकांची मने जिंकली. या स्पर्धेमध्ये एकूण २१ मुलांचा संघ सहभागी झाला होता. यामध्ये संघ व्यवस्थापक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.दयानंद माने, समन्वयक प्रा.डॉ. शंकर लेखणे, सह-समन्वयक प्रा.गोविंदराज पांचाळ व संघ व्यवस्थापिका डॉ. पुष्पा शेरे यांनी काम पाहिले. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, सचिव डॉ.मिनलताई पाटील खतगावकर प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजीराव पाटोदे व सर्व स्टाफ ने अभिनंदन केले आहे.

### विधानसभेच्या निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर


## शिरूर शहरामध्ये पोलीस व सीमा सुरक्षा दलाचे जवानांकडून पथ संचलन


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती | प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुक दरम्यान कायदा सुव्यवस्था अबाधित राहील व निवडणूक काळात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शिरूर पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस व सीमा सुरक्षा दलाचे जवानांचे शिरूर शहरात सशस्त्र पथसंचलन करण्यात आले.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, पुणे विभागाची अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, शिरूर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी त्यांचे कडील ४ पोलीस अधिकारी व ३० पोलीस अंमलदार तसेच सीमा सुरक्षा दलाकडील ५ अधिकारी व ७० जवान असे सशस्त्र संचलन शिरूर पोलीस स्टेशन पासुन शिरूर शहरामधील बी.जे. कॉर्नर, रामआळी, पाच कंदील चौक, डंबेनाला, सिध्दार्थनगर, आण्णाभाऊ साठे चौक, शिरूर बस स्टँड, इंदिरा गांधी पुतळा,बी.जे. कॉर्नर या भागात केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये होणारे प्रचार मतदान मतमोजणी इत्यादी या प्रक्रिया करता पोलीस प्रशासन सज्ज असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता सदरचे पथ संचलन करण्यात आले आहे.





## कै.विजय मखमले माध्यमिक विद्यालयांचा बादल खरात गोळा फेक स्पर्धेत राज्यस्तरावर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | ज्ञानेश्वर बुधवत**



तालुक्यातील हिवरखेड पूर्णा येथील कै.विजय मखमले माध्यमिक विद्यालयातील बादल प्रेम खरात याने विभागीय स्तरावर झालेल्या शालेय१७ वर्ष वयोगटात पात्र ठरला असून राज्य स्तरावर होणाऱ्या गोळा फेक स्पर्धेत पात्र ठरला आहे

ता.२४ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र राज्य क्रीडा संचलनालय पुणे यांच्या मार्फत जवाहरलाला नेहरू जिल्हा क्रीडा संकुल यवतमाळ जि.यवतमाळ या ठिकाणी विभागीय गोळा फेक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले १७ वर्षे वयोगटामध्ये गोळा फेक गटामध्ये विभागात पात्र ठरला आहे विभागीय स्तरावर झालेल्या गोळा फेक विभागांत विद्यार्थी सहभागी झाले होते.यावेळी क्रीडा शिक्षक सयाजी मंडपे, मुख्याध्यापक कोल्हे सर शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## जिल्हाप्रमुख ए.जे.पाटील . बोराडे महाविकास आघाडीकडून उमेदवारी अर्ज दाखल करणार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**मंठा | प्रतिनिधी**

परतुर विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. पाटील बोराडे २८ ऑक्टोबर सोमवार रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी महाविकास आघाडीचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी निवडणुकीचा ए बी फॉर्म महाविकास आघाडीचे उमेदवार शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. पाटील बोराडे यांना दिला. परतुर विधानसभा मतदारसंघाला न्याय मिळवून देण्यासाठी आपण ही निवडणूक लढवीत असल्याचे श्री बोराडे यांनी सांगितले. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी २८ ऑक्टोबर सोमवार रोजी परतूर येथे मतदार संघातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

## मनोज जरांगे पाटील जो उमेदवार देतील त्यांच उमेदवाराच्या पाठीमागे एकसंघ राहण्याची घेतली शपथ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | प्रतिनिधी**



कंधार लोहा विधानसभेच्या उमेदवारी साठी तालुक्यातील ८ इच्छुकांनी मराठा आरक्षण लढ्याचे नेते संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्याकडे मुलाखती दिल्या. यात प्रकाश भगनुरे पाटील,सतीश पाटील उमरेकर, पुरुषोत्तम धोंडगे, रंगनाथ पाटील भुजबळ, माधवराव तेलंग, बाळासाहेब जाधव, भास्कर पाटील ढगे, विठ्ठल पाटील, मोहनराव पाटील शिरसाट आदींचा समावेश आहे.

चार दिवसापासून इच्छूकांच्या जरांगे पाटील हे अंतरवाली सराटी येथे मुलाखती घेत आहेत. या सगळ्या उमेदवारांनी अंतरवाली सराटी येथे एकत्र येत आपल्यापैकी कुणालाही उमेदवारी दिली तरी तन, मन, धनाने प्रमाणिकपणे समाजाचे काम करण्याची शपथ घेतली. कोणत्याही आमिषाला बळी न पडता आपला पक्ष आणि आपले नेते बाजूला ठेवून समाजाप्रती प्रमाणिक राहण्याची शपथ यावेळी सगळ्यांनी घेतली. मनोज जरांगे पाटील जो उमेदवार देतील. त्याच उमेदवाराच्या पाठीमागे एकसंघ राहण्याची शपथ घेतली.

### झाडे लावा झाडे जगवा



### चारोळी

नात्यांचा धागा
अलगद गुंफत जावा
स्वार्थ न ठेवावा मनी
खरा अर्थ जाणूनी घ्यावा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## उस्माननगर येथील कन्याशाळेत कार्यानुभवातून आकाशदिवा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर | गणेश लोखंडे**



उस्माननगर येथील जिल्हा परिषद कन्या शाळेत शालेय विद्यार्थ्यांसाठी कार्यानुभव विषयावर आधारित दिपावली सणाच्या पार्श्वभूमीवर आकाशदिवा निर्मिती उपक्रम नुकताच घेण्यात आला. इयत्ता सहावीच्या वर्ग शिक्षिका मिनाक्षी लोलगे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमात चिमुकल्या विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. आकर्षक रंगसंगती, सुबकपणे साकारण्यात आलेल्या आकाशदिव्यांचे सर्व शिक्षक, विद्यार्थ्यांच्या पालकांनी कौतुक केले आहे. दुर्गेश्वरी घोरबांड, धनश्री साखरे, साफीया शेख, मिस्बा आदमनकर, प्राची साखरे, राजनंदनी काळम, कोमल जाधव, तनुजा शेकापूरे, सोनी कांबळे, आशा शेकापूरे या विद्यार्थिनीचे मुख्याध्यापिका विद्या वांगे यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## मतदान करा लोकशाही बळकट करा-प्रा.डॉ.साळवे.सी.जे.

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**



पंडित जवाहरलाल नेहरु उच्च माध्यमिक विद्यालयात नव मतदार जन जागृती अभियान राबविण्यात आले,या प्रसंगी,नव मतदारांना मार्गदर्शन करताना (समन्वयक,मतदान जनजागृती अभियान) प्रा.डॉ.चंद्रकांत साळवे बोलताना असे म्हणाले भारत देश हा जगात सर्वात श्रेष्ठ लोकशाही प्रधान देश म्हणून ओळखला जातो,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व समाजाला न्याय देणारी लोकशाहीची घटना,म्हणजे संविधान निर्माण केले.प्रत्येकाला मतदानाचा हक्क दिला,लोकशाही बळकट करण्यासाठी, मतदानाचा हक्क सर्वांनी बजावून लोकशाही सदृढ करावी असे मत व्यक्त केले. या प्रसंगी कार्यक्रम अध्यक्ष प्रा.गायकवाड ए.एन.( प्रमुख राष्ट्रीय सेवा योजना) उपस्थित होते,सूत्रसंचालन प्रा.राहुल सोनवणे यांनी केले,अभियान प्रसंगी उपस्थित,प्रा.चांगदेव सानप,प्रा.सुरेश फुले प्रा.निखिल सावंत, प्रा.संभाजी झिंजूर्के व नव मतदार उपस्थित होते.विद्यार्थी समन्वयक करण राजगुरू व अजित सावंत यांनी सहकार्य केले.

# एकजुटीत ग्रामोन्नती

लोकनेता न्यूज नेटवर्क

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो.अगोदर खेड्यांचा विकास झाला की,आपोआप राष्ट्र राज्याचा विकास घडवून येतो. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा केंद्रबिंदू मानला होता. ग्रामगीता या ग्रंथातील विचार सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहोचावे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने सवलतीच्या दरात दहा रुपये किमतीत ग्रामगीता उपलब्ध करून दिलेली आहे.गावाच्या एकजुटीमध्ये सर्व विकास दडलेला असतो.जोपर्यंत गावातील लहान-थोर मंडळी चांगल्या कार्यासाठी एकत्रित येणार नाहीत, तो पर्यंत गाव विकासापासून वंचितच राहणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे. हे कटू सत्य आहे.

गावाचा विकास करणारी व्यक्ती निरपेक्ष वृत्तीने काम करावे लागते. त्यांच्यामध्ये मानवतावादी दृष्टिकोन असला पाहिजे.हे गाव माझे आहे. आणि मी या गावचा रहिवासी आहे. या जबाबदारीने गावात येणाऱ्या प्रत्येक योजना तळागाळापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. तेव्हा गावाचा कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही. महाराष्ट्रातील काही गावे आदर्श का झाली ? याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे त्या गावातील एकजूट असणारा समाज, व समाजातील परोपकारी व इतरांना सामावून घेणारी व्यक्ती होय. तुमच्यामध्ये जोपर्यंत एकजूट एकवाक्यता, एकता राहणार नाही. तो पर्यंत तुम्ही सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक ,आध्यात्मिक, सांस्कृतिक प्रगती गावात करू शकणार नाही. साखरेचा कण जसा दुधाशी एकरूप होतो. तसे सर्व व्यक्ती गावाशी एकरूप झाले पाहिजे. तेव्हाच सर्व सुख आपल्या पायाजवळ लोळणे घेतात. असे नाही झाले तर सर्व योजनेपासून तुम्ही अनेक कोसो दूर राहणार ? प्रत्येक गावात बारा भानगडी असतात; हे जरी खरे असले तरी जुन्या काळात लोक अशिक्षित असून सुद्धा गुण्यागोविंदाने नांदत होते. आज सुशिक्षित असून सुद्धा वाद विवादाबरोबर प्रतिगामी जीवन जगत आहेत. कोर्टकचेरीत लोकांची संख्या वाढत आहे. आज छळ, दरोडे, नक्षलवाद,अपहरण,व्यभिचार, अत्याचार,दुराचार, बलात्कार राजरोसपणे घडत आहेत.मी मोठा कार्यकर्ता, मी भावी...असे अनेक बिरुदावली लावून त्यामध्ये मागेपुढे समाज व्यवस्था बिघडून जात आहे. गावचा विकास करायचा असेल तर गावाला शाळेचा अभिमान असावा. वर्गणी द्वारे गावातील अनेक कामे करून घेता येतात. विद्यार्थ्यांना



**प्रा.बरसमवाड विठ्ठल गणपत**
**संस्थापक: विठू माऊली प्रतिष्ठान**
**खैरकावाडी ता. मुखेड जि. नांदेड**

सर्व भौतिक, शैक्षणिक सुविधा देऊन उद्याचे सृजन नागरिक घडविता येतात.पाण्याची बचत करावी.पारावर गप्पा न करता वाचनालयात बसून वाचन संस्कृती जोपासावी. त्यासाठी विचाराची श्रीमंती प्रत्येक व्यक्ती जवळ असावी लागते. माझे शाळेत कोणी सध्या शिकत नाही, म्हणून कामात अडथळा आणू नये.आपल्या काळात काही झाले नाही म्हणून गैरसमज वाढवून गट तट करून कामाची वाट लावू नये. गावातील वातावरण नेहमी हलकेफुलके,स्वच्छ व पारदर्शक ठेवावे.सर्वांनी मिळून मिसळून सण साजरे करावेत. एकमेकांना शुभेच्छा द्याव्यात.

अल्पसंख्याकांचा जरूर विचार करावा. जे का रंजले गांजले। त्याशी म्हणे जो आपुले।।या उक्तीप्रमाणे वागावे.दीन, दलित, दुबळे, पीडित, गरिबांना पुढे आणण्यासाठी गावातील थोर मंडळींनी पुढाकार घ्यावा. नेहमी सकारात्मक विचार मांडावेत. व्यसनापासून दूर राहावेत. गावात हातभट्टी, विषारी दारू,पत्ते मटका इतर वाईट कृत्ये होऊ नयेत.यासाठी सर्वांनी एकत्रित मिळून अशा गोष्टी दूर कराव्यात.आज सुध्दा अनेक गावात भावकी भावकी मध्ये भांडणे आहेत.

तू माझ्यापेक्षा मोठा कसा? मी तुझ्या पेक्षा मोठा आहे. म्हणून येणाऱ्या शासकीय योजनेमध्ये सुद्धा अनेक अडथळे मुद्दाम निर्माण करतात. जिरवा जिरवीचे खेळ खेळतात. ग्रामीण भागात या खेळांना पहिले प्राधान्य दिले जाते. चहाडीला फार गोडी असते.भौतिक सुविधा बरोबर मानसिक सुख सुद्धा आज महत्त्वाचे आहे. हे तरुणांनी जाणून घ्यावे.गड्या आपला गाव बरा यानुसार वागावे.आणि म्हणावे. यारे यारे लहान थोर । याती नारी नर।। तेव्हा जगण्यास रंग येतो, म्हणून संत सोयरा बाई म्हणतात.अवघा रंग एक झाला। रंगी रंगला श्रीरंग। मी तूंपण गेले वाया। पाहता पंढरीचा राया ।। यानुसार सर्वांनी मिळून मिसळून वागावे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता प्रत्येकांनी वाचन करावी.

महाराष्ट्रातील आदर्श गावे प्रत्यक्ष पाहून घ्यावे.म्हणून त्यांनी ग्रामगीता ग्रामदेवतेलाच अर्पण केली. त्यामुळे ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा केंद्रबिंदू होता. आज आपण कोणत्याही शहरांमध्ये राहत असलो तरी,आपल्या गावाकडे आपले छोटेसे का होईना घर असावे. कोरोनाच्या काळामध्ये सर्वच लोकांना गावची आठवण आली. गड्या आपला गाव बरा म्हणून सर्व जण शहरे सोडून गावाकडे अहोरात्र चालत आले. हे ही आठवण आपण ठेवावी.आदर्श गावाची प्रेरणा घेऊन आपले गाव सुधारावे ही अपेक्षा..

# परळीत आ.पंकजाताई यांच्या हस्ते मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा शुभारंभ



लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी शहरात प्रथमच खास महिलांसाठी मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते शुभारंभ करण्यात आला. सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे ह्या उपस्थितीत होत्या. आहार व व्यायामाच्या माध्यमातून आयुष्याला सुंदर बनवा भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी प्रतिपादन केले.मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचाच्या माध्यमातून परळी व परिसरातील महिलांसाठी चांगली सुविधा उपलब्ध झाल्याने परळीकरांचे आरोग्य सुधारत असल्याचे सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी सांगितले.

परळी वैजनाथ शहरातील डॉ. देशपांडे यांच्या दवाखान्या मागे कन्या शाळा रोड परिसरात महिलांसाठी प्रथमच मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा शुभारंभ भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते पार पडले. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांनी सेंटरला शुभेच्छा दिल्या. कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या पत्नी सौ. राजश्री धनंजय मुंडे ह्या उपस्थितीत होत्या. याप्रसंगी बोलताना आ.पंकजाताई व सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी सर्व महिलांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, आजच्या धावत्या व धकाधकीच्या जीवनात महिलांनी फक्त चूल आणि मूल याच्या पलीकडे जाऊन आपले शरीर निरोगी व आरोग्यदायी कसे राहील याचे मार्गदर्शन करताना मधुराज डान्स स्टुडिओ ला जॉईन होऊन आपले शरीर निरोगी व आरोग्यदायी ठेवावे असे आवाहन केले. याप्रसंगी आ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, राजश्रीताई धनंजय मुंडे, मनीषाताई अजय मुंडे, प्राजक्ता ताई श्रीकृष्ण कराड, अक्षता ताई सुशील दादा कराड, संध्याताई प्रतापराव धर्माधिकारी, प्रीतीताई बालाजी मिसर या प्रमुख मान्यवरांची उपस्थितीत होत्या. तसेच शहरातील विविध व्यवसायातील व घरगुती अनेक महिला उपस्थित होत्या.

यावेळी मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओच्या संचालिका सौ.मधुरा विशाल पाठक यांनी सर्वमान्यवराचे स्वागत करून मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओ सुरू करण्यामागची भूमिका विषद केली.आहारातून आरोग्याकडे प्रत्येकाला नेण्यासाठी फिटनेस सेंटर सुरू करण्यात आले.मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा महिलांनी सेंटरचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी वासुदेव अनंतराव पाठक ( मा. नगरसेवक ) सुवर्णा वासुदेवराव पाठक, दत्तात्रय विठ्ठलराव कुलकर्णी, भारतीताई दत्तात्रय कुलकर्णी मा. नगरसेविका उपस्थितीत होते.परळी शहरात महिलांसाठी प्रथमच नव्याने सुरू झालेल्या मधुराज फिटनेस ॲण्ड डान्स स्टुडिओत महिलांसाठी एरोबिक्स, स्टेप एरोबिक्स, झुम्बा, कार्डिओ, मेडिटेशन, योगा इतर वर्कआऊटस् डमबेल्स वर्कआऊट, स्टीक वर्कआऊट, लेझिम वर्कआऊट, बॉलीवुड डान्स, ३ ते १२ वयोगटातील मुला-मुलिंसाठी क्लासिकल डान्स, फोल्क डान्स, बॉलीवुड डान्स, फ्री स्टाईल डान्स झुम्बा, एरोबिक्स, मेडीटेशन, योगा आदी सुविधा असणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ मधुरा पाठक तर दीपा अमित भताने यांनी आभार मानले.

# मा.आ.भीमराव धोंडे यांनी केलेल्या शैक्षणिक विकासामुळे गोरगरिबांची मुले उच्चशिक्षित-नानाभाऊ वाडेकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ.भीमराव धोंडे यांच्यामुळे मतदारसंघाच्या विकासाबरोबर शैक्षणिक विकासही मोठ्या प्रमाणात झाला आहे, त्यांच्यामुळे ग्रामीण भागातील वाड्या-वस्तीवरील गोरगरिबांचे मुले मुली उच्चशिक्षित बनली आहेत मतदारसंघाचा यापेक्षाही जास्त शैक्षणिक विकास करण्यासाठी विधानसभा निवडणुकीत मतदारांनी त्यांना सहकार्य करावे असे आवाहन पुंडी येथील जेष्ठ कार्यकर्ते नानाभाऊ वाडेकर व्यक्त केले.



याबाबत अधिक माहिती देताना नानाभाऊ वाडेकर यांनी सांगितले की, आष्टी पाटोदा शिरूर हा कायमस्वरूपी दुष्काळी भाग आहे. पुर्वी आष्टी तालुक्यात एक - दोन माध्यमिक शाळा व एकमेव वरिष्ठ महाविद्यालय होते. सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात वाढलेले भीमराव धोंडे हे १९८० साली विधानसभेवर निवडून गेल्यानंतर ते सलग पंधरा वर्षे विधानसभा सदस्य राहिले, त्यांनी शैक्षणिक संस्थांचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आज गावागावात,ग्रामीण भागात,डोंगरी भागात त्यांनी सुरू केलेल्या शाळामधून हजारो विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत.तसेच हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन पुढे उच्चशिक्षित होऊन शहरात नोकरी आणि व्यवसाय करीत आहेत. माजी आ.भीमराव धोंडे यांनी सुरू केलेल्या शाळामुळे खेड्यापाड्याचे मुले शिकले आहेत.त्यापूर्वी ग्रामीण भागातील पालक आपल्या मुला मुलींना विशेष करून मुलींना नगर,पुणे,संभाजीनगर या ठिकाणी शिक्षणासाठी पाठवत नव्हते.ठराविक पालकच आपल्या पाल्यांना बाहेर शिक्षणासाठी पाठवत होते,परंतु माजी आ.भीमराव धोंडे यांनी गावागावात शाळा सुरू केल्या. कडा,आष्टी,धानोरा, तिंतरवणी,अंमळनेर येथे वरिष्ठ महाविद्यालय सुरू केले तसेच आष्टीत कृषी,वैद्यकीय इंजीनियरिंग,फार्मसी असे सर्व प्रकारचे महाविद्यालये आष्टी येथे सुरू केल्याने तालुक्यातील खेड्यापाड्यातील मुले मुली उच्चशिक्षित बनले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी शैक्षणिक विकासाबरोबर वीस वर्षे विधानसभा सदस्य असताना मतदारसंघाचा चांगला विकास केला आहे गावागावात पाझर तलाव केले. गांव, वाड्या, वस्त्या चांगल्या रस्त्याने जोडले आहेत असा सार्वजनिक विकास मोठ्या प्रमाणात केला आहे. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांना मतदानाच्या रुपाने सहकार्य करण्याचे आवाहन वाडेकर यांनी केले आहे.



कंधार लोहा विधानसभेचे महाविकास आघाडी चे उमेदवार एकनाथ दादा पवार यांनी संतोष पाटील वडवळे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज केला दाखल.असंख्य कार्यकर्ते व लाखोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

# प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.रमेश गवाले यांनी स्विकारला पदभार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । प्रतिनिधी**

कंधार येथील तालुका आरोग्य अधिकारी डॉ.उमाकांत बिराजदार यांची ता.उमरगा जि.धाराशिव येथे विनंती बदली झाल्याने शुक्रवारी, २५ ऑक्टोबर रोजी देगलुरचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.रमेश गवाले यांनी कंधारचे प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी म्हणून पदभार स्विकारला आहे.



यावेळी डॉ.रमेश गवाले यांचा तालुका आरोग्य अधिकरी कार्यालयातील आरोग्य सहाय्यक व्यंकटी शेळके, गोविंद सावरकर,वरिष्ठ लिपिक व लेखापाल राम प्रेमलवाड यांनी शाल, पुष्पहार घालून सत्कार केला. तसेच बारुळचे वैद्यकीय अधिकारी डॉ.योगेश दुलेवाड व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ.पल्लवी कलेटवाड यांनी देखील सत्कार केला. यावेळीकुमार कांबळे, कुष्टरोग तत्रंज्ञ एकनाथ पठाडे,तालुका समूह संघटक सुशिल आलेगावकर, कार्यक्रम सहाय्यक मंगेश कुलकर्णी, कुरुळ्याचे प्रयोग शाळा वैज्ञानिक अधिकारी रमेश चाटे, उमरजचे समूदाय आरोग्य अधिकारी डॉ.माणिक केंद्रे, बारुळचे आरोग्य सहायक बाबराव येलुरे, विशाल बनसोडे, शेख लतिफ आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

# लोकशाहीची ताकद तुमच्या मतात आहे-सत्यजित मच्छिंद्र

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा पंचायत समिती शिक्षण विभाग, श्रीगोंदा फॅक्टरी येथील इंदिरा गांधी विद्या निकेतन व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जोशी वस्ती यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या 'मतदान जागृती अभियान' अंतर्गत मतदार जागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी सत्यजित मच्छिंद्र यांनी मार्गदर्शन केले. भारतात जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. जिथे प्रत्येक प्रौढ नागरिक आपल्या मताचा वापर करण्यास स्वतंत्र असतो. सरकार बनविण्यात देशातील प्रत्येक मतदारांची महत्वाची भूमिका असते. सरकार स्थापन करण्यासाठी प्रत्येक मत अमुल्य आहे. एक-एकच्या मताने सरकार बनते आणि बिघडते. म्हणून, प्रत्येकाने निःपक्षपातीपणे मतदान केले पाहिजे, आणि राष्ट्रनिर्मितीत त्यांचा सहभाग निश्चित केला पाहिजे, तसेच देशाच्या विकासासाठी सक्षम व्यक्तीच्या निवडीमध्ये सहकार्य केले पाहिजे जेणेकरून आपला देश सतत प्रगतीच्या नव्या उंचीवर येऊ शकेल. आपल्या भारतातील प्रत्येक नागरिकाला मत देण्याचा अधिकार आहे. मतदार त्यांच्या मताचा उपयोग राष्ट्र उभारणी आणि विकासात संपूर्ण सहकार्य करण्यासाठी करू शकतात. देशातील प्रत्येक प्रौढ नागरिकाने प्रत्येक निवडणुकीत आपले मत वापरावे कारण प्रत्येक मत देशाच्या भविष्यातील भागीदार बनते. भारतासारख्या लोकशाही देशात प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क आहे. निवडणुकीपूर्वी विविध राजकीय पक्षांचे उमेदवार जनतेसमोर आपले विचार व अजेंडा मांडतात. दुसरीकडे, ज्या उमेदवाराच्या अजेंड्यावर बहुतेक लोक आपली संमती व्यक्त करतात आणि सर्वाधिक मतदान करतात, त्याच उमेदवाराला लोकप्रतिनिधी म्हणून निवडले जाते आणि ते देशातील सर्व




विकासात्मक कामांसाठी जबाबदार असतात. म्हणून, प्रत्येक नागरिकाने त्यांच्या मताधिकारांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे.

विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनीही आपले मत व्यक्त केले. सशक्त राष्ट्राची सुरुवात तुमच्या मताने होते. प्रत्येक नागरिकासाठी मतदान करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, निरोगी लोकशाही निर्माण करण्याची ही एक प्रक्रिया आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाने वयाची १८ वर्षे पूर्ण होताच, त्यांनी मतदान करण्यासाठी मतदार यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट केले पाहिजेत आणि सरकारकडून वैध ओळखपत्र मिळविले पाहिजेत. शेवटी, हे जाणून घ्या की ते फक्त आपला हक्कच नाही तर आपले कर्तव्य देखील आहे. निवडणुकीच्या वेळी कोणी खोट्या थापा किंवा आमिष दाखविलं तर त्याला तुम्ही भुलू नका.सकाळ सत्रात जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देत परिसर दुमदुमून टाकला. प्रभात फेरीचे नियोजन पर्यवेक्षक अनिल जाधव, आरती परकाळे, पुष्पा काळे, वर्षा दरेकर, सुरेखा काळे, संदीप गायकवाड, कल्पक राऊत, शिवाजी क्षीरसागर, मंगेश काकडे, भाऊसाहेब राऊत, माऊली जाधव यांनी केले.या प्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी सीताराम भुजबळ, केंद्रप्रमुख अलका भालेकर, मुख्याध्यापक सुरेश हराळ, माजी मुख्याध्यापक लहू दरेकर, बन्यामीन पवार, बाळकृष्ण रोटकर, शैला जगताप, शमिना शेख व समस्त मतदार बंधू-भगिनी उपस्थित होते.

# राज्य शासनाच्या मोफत गणवेशाच्या मापात पाप;विद्यार्थ्यांना एकाच मापाचा गणवेश तर मुलांना हाफ पॅन्ट तर मुलींना ओढणीच नाही-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

राज्य शासनाच्या एक राज्य,एक गणवेश योजनेचा पुरता बोजवारा उडाला असुन १५ जुन रोजी शाळा सुरू होऊन तब्बल सव्वा ४ महिन्यानंतर शाळेतील मुलांना दोन पैकी एकच गणवेश मिळाला असुन जिल्हा परिषदेच्या पहिली ते आठवीच्या अनेक विद्यार्थ्यांना गणवेश मिळाला नाही आता दोन पैकी फक्त एक गणवेश मिळाला असुन तो सुद्धा परीधान करण्यासारखा नाही.कारण विद्यार्थ्यांचे माप न घेताच एका वर्गातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना एकाच मापाचे गणवेश दिले आहेत.त्यामुळे कुणाला आखुड तर कोणाला मोठा ( ढगळ) झाला आहे. त्यातच पाचवी ते आठवी पर्यंत विद्यार्थ्यांना हाफ पॅन्ट व मुलींना ओढणीच देण्यात आली नाही त्यामुळे एकंदरीतच शासनाच्या गणेवेशाच्या मापातच पाप असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.





समग्र शिक्षा अभियान अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिला जातो.मागील काही वर्षांत शाळा व्यवस्थापन समितीकडुनच गणवेशाचे कापड खरेदी करून गणवेश शिवुन दिला जात होता.यामध्ये इयत्ता चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शर्ट, हाफपन्ट दिली जात होती तर पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना फुलपन्ट दिली जात होती.मात्र शासनाने यावर्षी मुंबईत निविदा काढुन गणवेशाचे कापड पुरवले.त्यानंतर महिला आर्थिक विकास महामंडळाकडुन गणवेश शिवुन वाटप केले जात आहेत.यावर्षी पुरविण्यात आलेल्या गणवेशामध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शर्ट व हाफ पॅन्टचा पुरवठा करण्यात आला आहे.तर विद्यार्थ्यांनींना ओढणी देण्यात आली नाही.त्यामुळे विद्यार्थी हाफ चड्डी परीधान करून शाळेत जाण्यास नाखुष आहेत.परीणामी अनेक विद्यार्थी गणवेश मिळुनही ते शाळेत गणवेश घालूनच येत नसल्याची वस्तुस्थिती पोखरी (घाट) येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विलास पाखरे यांनी बोलून दाखवली. याचवेळी पोखरी (घाट) येथील शाळेची पटसंख्या १५१ असताना केवळ १२७ मुलांना गणवेश मिळाला असुन आठवीच्या विद्यार्थी विद्यार्थिनींना अद्याप गणवेश मिळालाच नाही.शाळा सुरू होऊन ४ महिने उलटूनही जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मोफत गणवेश वाटप न केल्याने तातडीने गणवेशाचे वाटप करण्यात यावे यासाठी दि.७.१०.२०२४ रोजी शिक्षणाधिकारी यांच्या दालनात लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येईल असे लेखी निवेदन दिल्यानंतर शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) भगवान फुलारी यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात स्काऊट व गाईड विषयास अनुरूप गणवेशासाठी कापड तालुकास्तरावर प्राप्त झाले असुन सदरील कापड विद्यार्थी संख्या निहाय शाळा निहाय वितरीत करण्यात येणार असल्याच्या सुचना गटशिक्षणाधिकारी यांना दिल्या आहेत.त्यामुळे आंदोलन मागे घेण्यात यावे असे लेखी कळवले होते.मात्र या घटनेला १५ दिवस उलटुनही अद्याप दोन पैकी एकच गणवेश मिळाला असुन तो सुद्धा वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना एकाच मापाचा शिवल्याने काहींना आखुड तर काहींना ढगळ येत आहे. पाचवी ते आठवीच्या मुलांना हाफ पॅन्ट तर मुलींना ओढणीच नाही.मात्र. गेल्यावर्षी पर्यंत शाळा व्यवस्थापन समिती मार्फत देण्यात येणाऱ्या गणवेशात मुलांना फुलपन्ट तर मुलींना ओढणी देण्यात येत होती. त्यामुळे गतवर्षी प्रमाणेच गणवेशाचे कामकाज शालेय व्यवस्थापन समिती मार्फत करण्यात यावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## डॉ.माधव विभुते यांना उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल धर्माबाद पानसरे चौक येथे फटाकेची आतिषबाजीने जल्लोष साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

धर्माबाद । साहेबराव दुगाने

नायगाव विधानसभा निवडणुकीच्यां तारखा जाहीर झाल्या असतांनाच नायगाव विधानसभा मतदार संघाचे अधिकृत उमेदवार म्हणून मा. डॉ.माधव विभुते यांना वंचित बहुजन आघाडी पक्षा तर्फे उमेदवारी जाहीर करण्यात आली, नांदेड जिल्ह्यामध्ये तथा नायगाव विधानसभेमध्ये हे सर्व दूर परिचित आहेत.तसे पाहता उमरी येथे स्त्रीरोग तज्ञ परी हॉस्पिटल च्या माध्यमातून डॉ.माधव विभूते हे उच्च शिक्षित,सुसंस्कृत व समाज सेवेची आवड असणार व्यक्तिमत्व आहे,त्यांचा जन्म अतिशय गरीब कुटुंबांमध्ये झालेला असून ते ओ.बी.सी समाज प्रवरगामध्ये मोडतात,त्यांना तरुण वयापासूनच समाज सेवेची आवड असून,गोरगरीब विद्यार्थ्यांची अडले नडले ली कामे करणे,सामाजिक चळवळीत सक्रिय राहणे हे त्यांचे विशेष गुण वैशिष्ट्य,त्यांच्या या सर्व सामाजिक कामाची दखल घेऊनच वंचित बहुजन आघाडी चे सर्वेसर्वा आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांनी त्यांना उमेदवारी बहाल केली, त्यामुळे धर्माबाद शहरातील पानसरे चौक येथे वंचित बहुजन आघाडी कडुन उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल फटाकेच्या आतिषबाजीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

पानसरे चौक येथे शहरातील व ग्रामीण भागातील असंख्य मान्यवर उपस्थित होते.मतदार संघातील लोकांचा दांडगा जनसंपर्क लक्षात घेता नायगाव विधानसभा मतदार संघात त्यांचा नीच्छितच विजय होईल असे तिन्ही तालुक्यातून अनुभवी व्यक्ती बोलून दाखवत आहेत. माणुसकीचे भांडवल, गरिबांचा आशीर्वाद ,गोरगरिबांचे कैवारी देव माणूस म्हणजे डॉ.विभुते हे तिन्ही तालुक्यातून जनतेतून बोलल्या जात आहे. आम्ही कोणासोबतही राहू,आम्ही कोणासोबतही फिरू, परंतु मतदान मात्र डॉ.माधव विभूते साहेबांनाच करू असे सरळ सरळ जनतेतून बोलल्या जात आहे. एक सर्वसामान्य जनतेला उच्चशिक्षित उमेदवार नायगाव विधानसभा मतदारसंघाला मिळाला आहे त्यामुळे त्यांचा निश्चितच विजय होईल असे तिन्ही तालुक्यातून जनतेतून बोलल्या जात आहे.

## पत्रकाराला मारहाण करून धमकी देणाऱ्या विरुद्ध पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कारवाई करा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील व्हॉईस ऑफ मीडियाचे सदस्य तथा पत्रकार अजित पवार यांनी बातमी प्रकाशित केल्याचा राग मनात धरुन ४ जणांनी मारहाण करत जिवे मारण्याची धमकी देणाऱ्यांच्या विरोधात पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत कारवाई करावी व सदरील घटनेचा निषेध व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने तहसील कार्यालय आणि पोलीस उपविभागीय अधिकारी अश्विनी जगताप यांना निवेदन देऊन करण्यात आले.

पत्रकार अजित पवार हे मंगळवार, दि.२२ रोजी संध्याकाळी ७:३० दरम्यान मुखेड बा-हाळी रोडवर जात असताना खानापुर फाट्याजवळ पत्रकार पवार यांची मोटारसायकल अडवून आरोपी नदीम पाशा तांबोळी, गंगाधर गोरशेटवाड व इतर दोन अनोळखी इसमांनी मारहाण केली. व अश्लिल भाषेत शिविगाळ करून



जिवे मारण्याची धमकी दिली. याघटनेची व्हॉईस ऑफ मिडीयाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदिप काळे व जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी यांना मिळताच त्यांनी तात्काळ पोलिस प्रशासनास संपर्क करुन सदरील घटनेच्या विरोधात भारतीय न्याय संहिंताच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

संबंधित आरोपीवर गुक्रामाबाद पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हा र.नं.२२७/२४ विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु स्थानिक पोलीस प्रशासनाने पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करून घेतला नाही म्हणून संबंधित आरोपीवर पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून तत्काळ अटक करावी. अन्यथा येणाऱ्या काळात व्हाईस ऑफ मिडिया शाखा कंधार तथा व नांदेड जिल्ह्यातील पत्रकार बांधवांच्यावतीने तीव्र राज्यव्यापी आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी.पत्रकार बांधवास झालेल्या मारहाणीचा कंधार पत्रकार बांधवांनी निषेध करत दि. २३ रोजी तहसील कार्यालय कंधार यांना निवेदन देत सदरील आरोपींवर पत्रकार संरक्षण कायद्यानुसार कारवाईची मागणी केली.या निवेदनावर जेष्ठ पत्रकार हाफीज घडीवाला, दयानंद कदम, मुरलीधर थोटे, व्हाईस ऑफ मिडियाचे तालुकाध्यक्ष सय्यद हबीब, उपाध्यक्ष मारोती चिलपिपरे, सचिव विनोद पा.तोरणे,कार्याध्यक्ष माधव गोटमवाड, सहसचिव संतोष कांबळे ड सिद्धार्थ वाघमारे, , ड उमर शेख, मगदूम परदेशी, जमील बेग आदी पत्रकार बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## आष्टी वकील संघाचे अध्यक्षपदी अजय जेवे विजयी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

आष्टी वकील संघाच्या अध्यक्षपदासाठी चुरशीने झालेल्या निवडणुकीत अजय नाना जेवे हे ७५ मते घेऊन विजयी झाले,तर उपाध्यक्षपदी किशोर कल्याण निकाजे,सचिवपदी यासीर ताहेर सय्यद,कोषाध्यक्षपदी संदीप रावसाहेब जगताप व महिला प्रतिनिधीपदी अर्चना चंद्रशेखर पाटील बिनविरोध निवड झाली आहे.आष्टी वकील संघाची जाहिर झाल्यानंतर उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या मुदतीपर्यंत वरिष्ठ मंडळीच्या मार्गदर्शनाखाली सचिव, सचिव,कोषाध्यक्ष महिला यांची बिनविरोध दि.१७ ऑक्टोबर २०२४ रोजी निवड करण्यात आली होती.अध्यक्षपदासाठी अजय नाना जेवे,बाळासाहेब महादेव झांबरे व संभाजी मोहन

दहातोंडे हे तीन उमेदवार रिंगणात होते.दि.२२ ऑक्टोबर २०२४ रोजी मतदान पार होऊन एकूण १४७ पैकी एकूण १४४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.मतदारानंतर सायंकाळी पाच वाजता मतमोजणी झाली.त्यात अजय जेवे यांना ७५ मते मिळून ते विजयी झाले.बाळासाहेब झांबरे यांना ४५,तर संभाजी दहातोंडे यांना २४ मते मिळाली.यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ड.एम.एस.झांजे व ड.बापूराव गर्जे यांनी काम पाहिले.





# शरद पवार यांच्या आशिर्वादाने इंदापुरात व राज्यात सत्ता बदल निश्चित-हर्षवर्धन पाटील

## नीरा नरसिंहपूर येथून प्रचाराचा शुभारंभ;हर्षवर्धन पाटील यांच्यावर जेसीबीतून पुष्पवृष्टी

### खंडकरी शेतकऱ्यांना हर्षवर्धन पाटील यांच्यामुळेच जमिनी-अँड.तेजसिंह पाटील

**खंडकरी शेतकऱ्यांना पाटपाण्याच्या हक्कासह मिळालेल्या जमिनी ह्या राज्य मंत्रिमंडळात अनेक वर्ष मंत्री असलेले हर्षवर्धन पाटील यांच्यामुळेच मिळालेल्या आहेत, हे मी या मंदिरात श्रीलक्ष्मी-नृसिंहा समोर सांगत आहे. मी त्याकाळचा खंडकरी शेतकरी समितीचा सदस्य आहे, केवळ आणि केवळ हर्षवर्धन पाटील यांच्यामुळेच आपल्या तालुक्यातील सुमारे २२१५ एकर जमिनी खंडकरी शेतकऱ्यांना मिळू शकल्या, असे भाषणात अँड.तेजसिंह पाटील यांनी नमूद केले. राज्यातील कार्यक्षम व अभ्यासू नेतृत्व असलेले हर्षवर्धन पाटील यांना प्रचंड बहुमताने विधानसभेत पाठवा, असे आवाहनही अँड.तेजसिंह पाटील यांनी भाषणामध्ये केले.**





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे

देशाचे नेते शरदचंद्र पवार यांचे नेतृत्व आपणा सर्वांना लाभले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली इंदापूरात व राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीमध्ये सत्ता बदल हा निश्चित आहे. इंदापूर तालुक्यातील सध्याच्या राजकीय बदलाच्या लाटेमध्ये जनतेने सहभागी व्हावे, असे आवाहन इंदापूर विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे उमेदवार, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी श्री क्षेत्र निरा नरसिंहपूर (ता. इंदापूर) येथे शुक्रवारी (दि.२५) केले. नीरा नरसिंहपूर येथे प्राचीनकालीन श्री लक्ष्मी-नृसिंह मंदिरात इंदापूर विधानसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या निवडणुक प्रचाराचा शुभारंभ विधिवत पूजा व नारळ फोडून करण्यात आला, सदर प्रसंगी हर्षवर्धन पाटील बोलत होते. तत्पूर्वी नीरा नरसिंहपूर येथे कार्यकर्त्यांनी हर्षवर्धन पाटील यांचे जेसीबीमधून पुष्पवृष्टी करीत स्वागत केले.

ज्येष्ठ नेते शंकररावजी पाटील उर्फ भाऊ यांच्या सन १९५२ च्या पहिल्या निवडणुकीपासून श्री क्षेत्र नीरा नरसिंहपूर येथे नारळ फोडून प्रचाराचा शुभारंभ करून, श्री लक्ष्मी-नृसिंहाचे आशीर्वाद घेण्याची परंपरा आहे. इंदापूर तालुक्यातील विद्यमान लोकप्रतिनिधीची १० वर्षाची निष्क्रिय कारकीर्द संपवून, इंदापूर तालुक्याचा सर्व क्षेत्रामध्ये सर्वांगीण विकास करण्यासाठी लक्ष्मी-नृसिंहाचे आशीर्वाद आपण घेतलेले आहेत. इंदापूर तालुक्याच्या विकासाला १० वर्षे लागलेला ब्रेक हा आगामी ५ वर्षात भरून काढला जाईल, अशी ग्वाही यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी दिली. सध्याच्या लोकप्रतिनिधीनी त्यांच्या काळात सहकारी संस्था,शिक्षण संस्था काढून रोजगार देण्याचे काम केले नाही. उलट गुण्या-गोविंदाने एकत्र राहत असलेले समाजा-समाजामध्ये स्वार्थासाठी तेढ निर्माण करण्याचे काम केले आहे.शासनाकडून विकास कामासाठी येणारा पैसा हा जनतेचा पैसा असतो. मात्र हा पैसा तालुक्यातील जनतेच्या विकासाऐवजी काही ठराविक लोकांच्या खिशात गेलेला दिसत आहे. सध्याच्या लोकप्रतिनिधी बनवा-बनवी थांबवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाला साथ द्या,असे आवाहन हर्षवर्धन पाटील यांनी केले.

शरदचंद्र पवार हे वयाच्या ८४ वर्षीही अपराजित योद्धा म्हणून लढत आहेत, या वयात त्यांचा काही स्वार्थ आहे का? तरीही ते संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढत आहे, कारण त्यांना महाराष्ट्राची विस्कटलेली घडी पुन्हा बसवायची आहे. सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे काम करायचे आहे. त्यामुळे शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली इंदापूर विधानसभा मतदारसंघातून तुतारीला विक्रमी मताधिक्याने विजयी करा, असे आवाहनही हर्षवर्धन पाटील यांनी केले. प्रास्ताविक प्रकाश काळे यांनी केले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अँड.तेजसिंह पाटील, अशोकराव घोगरे,शिवसेना (उबाठा)चे तालुकाध्यक्ष नितीन शिंदे,संतोष मोरे यांची भाषणे झाली. यावेळी विलासराव वाघमोडे,उदयसिंह पाटील,अमोल भिसे,मयूरसिंह पाटील, गणेश इंगळे, पांडुरंग हेगडे,सिकंदर पैलवान,सुरेश जगदाळे,मनोज पाटील, किरण पाटील,रवींद्र जगदाळे,शेखर पाटील,रणजीत वाघमोडे,रोहित जगदाळे,सुरेश मेहेर,प्रतापराव पाटील, दादासाहेब घोगरे,प्रकाशराव मोहिते, शरद जगदाळे पाटील,शिवाजी हांगे, तानाजीराव नाईक,उत्तमराव जाधव, विक्रम कोरटकर,प्रभाकर खाडे,रणजित गिरमे,हरिभाऊ बागल,प्रदीप बोडके, संजय शिंदे,नामदेव घोगरे,विठ्ठल घोगरे, नानासाहेब देवकर,कैलास हांगे, माणिकराव खाडे,राजाभाऊ मोहिते,बापू जगदाळे,दादा पाटील,हनुमंत काळे, पप्पू गोसावी, समीर पाटील,दत्तात्रय ताटे देशमुख,किशोर माहिते,मेघनाथ सरवदे, बळीराम गलांडे,अभिजीत पावसे, शहाजी पावसे,महादेव भोसले,दिपक पावसे आदींसह पदाधिकारी,कार्यकर्ते ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार नाथाजी मोहिते यांनी मानले.या कार्यक्रमानंतर हर्षवर्धन पाटील यांनी व्याहळी येथे जाऊन भैरवनाथ मंदिरात परंपरेनुसार प्रचाराचा नारळ फोडला.

# कलंबर (बु.) येथे श्री.संत अगडंमबुवा यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

उस्माननगर येथून जवळच असलेल्या कलंबर ( बु) ( ता. लोहा) येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी हिमवत वैराग्य पिठाधीश्वर श्री.श्री.श्री. १००८ जगद्गुरु भीमाशंकर महास्वामीजी , शिवाचार्यरत्न श्री. ष. ब्र. प्र. षडाक्षरी शिवाचार्य महाराज यांच्या सान्निध्यात दि . २८ ऑक्टोबर २०२४ पासून श्री संत अगडंमबुवा यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे . यावेळी यात्रेनिमित्त जिजाऊ बल्ड सेंटर शिवाजी नगर नांदेड यांच्या वतीने महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आणि दि.चार नोव्हेंबर रोजी सोमवारी सकाळी पाच वाजता श्री संत अगडंमबुवा पालखीचे अग्नी प्रवेश होईल. कलंबर बु. ता. लोहा येथे अनेक वर्षांपासून ग्रामदैवत श्री संत अगडंमबुवा यात्रेत यावर्षी मोठ्या प्रमाणावर धार्मिक, सामाजिक,आरोग्य विषयक,कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरात प्रसिद्ध असलेल्या या यात्रेत पंचक्रोशीतील भाविक, भक्त मंडळी व गावातील लेकी बाळीं आवर्जून उपस्थित राहतात.

पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांची गर्दी उसळते. दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री संत अगडंमबुवा यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सप्ताहात पहाटे ४ ते ५ काकडा भजन , सहा ते नऊ ज्ञानेश्वरी पारायण , ९ ते ११ गाथा भजन , १२ ते ४ महीला मंडळ भजन , सायं. ४ ते ५ ज्ञानेश्वरीवर प्रवचन , ५ ते ६ हरिपाठ , रात्रौ ९ ते ११ हरि किर्तन व हरिजागर , आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आली आहेत. मित्ती कार्तिक शु. तृतीय दि. ३ नोव्हेंबर २०२४ रविवारी सायंकाळी ७ वाजता , अग्नी पुजनानंतर अग्नी प्रज्वलित करण्यात येईल , व रात्री संगीत भजनाचा कार्यक्रम होईल. मित्ती कार्तिक शु. ४ चतुर्थी दि.४ नोव्हेंबर रोजी सोमवारी सकाळी पाच वाजता श्री संत अगडंमबुवा यांची पालखी अग्नीकुंडातून प्रवेश केल्यानंतर , गावातील प्रमुख रस्त्याने टाळ मृदंग वीणाच्या निनादात मिरवणूक निघेल , ११ ते १ काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री





संत अगडंमबुवा यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सप्ताहात नामवंत किर्तनकार व प्रवचनकार म्हणून दि. २८ रोजी प्रवचनकार म्हणून शिवभक्त शिवराज महाराज कलंबरकर , तर किर्तनकार ह.भ.प. ज्ञानोबा माऊली गुंडेवाडीकर , दि.२९ ऑक्टोबर रोज मंगळवारी प्रवचनकार ह.भ.प. दत्तराम पाटील सोरगे तर किर्तनकार ह भ. प. ज्ञानेश्वरी महाराज भारती आळंदीकर , दि.३० बुधवारी प्रवचनकार ह भ. प. गुरू गयबी नागेंद्र महाराज भारती पानभोसीकर , तर किर्तनकार ह भ.प. एकनाथ महाराज आळंदीकर , दि. ३१ गुरूवारी प्रवचनकार म्हणून ह. भ.प. बाबुराव उमाजीराव गोरे कलंबरकर , तर किर्तनकार ह. भ.प. नामदेव महाराज दापकेकर , दि.१ नोव्हेंबर रोज शुक्रवारी प्रवचनकार म्हणून ह. भ. प. दत्तराम पाटील पोखरभोसीकर तर किर्तनकार ह. भ.प. निवृतीनाथ महाराज ईसादकर , दि. २ नोव्हेंबर शनिवारी प्रवचनकार म्हणून ह. भ.प. माधव पाटील घोरबांड , तर किर्तनकार ह.भ.प. भगवान महाराज सेंद्रेंकर , दि.३ नोव्हेंबर रोज रविवारी सकाळी ९ वा. किर्तनकार म्हणून ( बाल किर्तनकार आळंदी ), ह. भ. प. ओमकार महाराज धुमाळवाडीकर , दि ४ नोव्हेंबर सोमवारी काल्याचे किर्तन सकाळी ११ वा . ह.भ.प. भिमराव महाराज सुर्यवंशी फुठाणेकर यांचे होईल. त्यानंतर महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. दि. ३ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, यात्रेत येणाऱ्या भाविक, तरुण,महीला, पुरुष यांनी रक्तदान शिबीरात सहभागी होवून शिबीर यशस्वी करावे.

श्री संत अगडंमबुवा यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यातील कार्यक्रमाचा, महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी व यात्रा कमिटी यांनी केले आहे.

# महाविकास आघाडीच्या वतीने राजेभाऊ श्रीराम फड सोमवारी करणार उमेदवारी दाखल

## मतदारसंघातील प्रमुख नेत्यांची असणार उपस्थिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तसेच महाविकास आघाडीच्या वतीने राजेभाऊ श्रीराम फड हे सोमवार दिनांक २८ रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. २३३ परळी विधानसभा मतदारसंघातून त्यांना महाविकास आघाडीकडून उमेदवारी जाहीर होण्याचे संकेत आहेत. मोठ्या ताकदीने ते या निवडणुकीला सामोरे जात आहेत. मागील काळातील त्यांनी केलेले सामाजिक कार्य, त्यांना असलेला राजकीय अनुभव आणि जनतेत असलेली त्यांची सकारात्मक ओळख लक्षात घेत पक्षाने त्यांच्यावर या निवडणुकीत उतरण्याची मोठी जबाबदारी टाकली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार तसेच महाविकास आघाडीच्या सर्व प्रमुख नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली परळी विधानसभा मतदारसंघातून राजेभाऊ श्रीराम फड हे आपला उमेदवारी अर्ज येत्या सोमवारी दाखल करणार आहेत. परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व प्रमुख नेत्यांची यावेळी उपस्थिती असणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि मित्र पक्षाच्या वतीने राजेभाऊ फड विधानसभा निवडणुकीच्या रणमैदानात ताकदीने उतरत आहेत. सर्वसामान्य जनतेतून त्यांना मोठा पाठिंबा मिळताना दिसतोय.



लोकांमधील त्यांची लोकप्रियता लक्षात घेता पक्षाने त्यांच्यावर ही निवडणूक लढवण्याची मोठी जबाबदारी टाकली आहे.विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत उमेदवारी देत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांनी चांगलीच सोशल इंजीनियरिंग साधली आहे. राज्याचे माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, प्रताप ढाकणे, राजेभाऊ फड यांच्यासह अनेकांना संधी देऊन शरदचंद्र पवार यांनी ओबीसी समाजाला मोठा न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. बीड जिल्ह्यातील पाच जागांवर उमेदवार देऊन पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. यामध्ये मुस्लिम समाजाला न्याय देत आष्टी मतदार संघातून महेबुब भाई शेख, केजच्या राखीव जागेवर पृथ्वीराज साठे यांना दुसऱ्यांदा तर परळी विधानसभा मतदारसंघातून ओबीसी समाजाला न्याय देत राजेभाऊ फड यांना निवडणुकीच्या मैदानात शरद पवारांनी उतरवले आहे. पवारांच्या या सोशल इंजिनिअरिंगची सर्वत्र जोरदार चर्चा होत असून त्यांना मोठ्या प्रमाणावर सहानुभूती मिळताना दिसते आहे.

# हिंगोली विधानसभेसाठी रामदास पाटील सुंमठाणकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली विधानसभेसाठी दि/२५ ऑक्टोबर रोजी रामदास पाटील सुंठणकर यांनी अनेक कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेत आज अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे सध्या हिंगोली विधानसभेसाठी अनेक उमेदवारी अर्ज दाखल होत आहेत तर यामध्ये रामदास पाटील सुंमठाणकर यांनी आज दुपारी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज भरला असून यावेळी अनेक कार्यकर्तेच्या उपस्थितीतीमध्ये हिंगोली विधान सभेसाठी आज अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे रामदास पाटील सुमठाणकर यांनी हिंगोली विधानसभेतील अनेक गाव खेड्यांना भेटीगाठी देऊन नागरिकांचे प्रश्न सोडवण्याकरिता हिंगोली विधानसभेवर जाऊन हिंगोली विधानसभेतील अनेक प्रश्न मांडता येतील या उद्देशाने कार्यकर्त्यासह आज अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे,

# माजी आमदार राहुल जगताप यांच्या अपक्ष उमेदवारीन अनुराधा नागवडे यांची डोकेदुखी वाढली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा. तालुक्यात आघाडीच्या सर्वच पक्षांना बंडखोरीच ग्रहण लागले आहे जसजसी निवडणूक जवळ येत आहे तसे तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापत चालले आहे ठाकरे सेनेच्या उमेदवार अनुराधा नागवडे यांना तिकीट जाहीर होताच तालुक्यांत महाआघाडीत बंडखोरी ने चांगलाच जोर धरला आहे काँग्रेसचे नेते अण्णासाहेब शेलार वंचित बहुजन आघाडी कडुन उमेदवारीच्या रिंगणात उतरले आहेत तर घनश्याम शेलार हे सुद्धा उमेदवारीसाठी मैदानात उतरले आहेत तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते राहुल जगताप कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर अपक्ष लढण्याची घोषणा केली





आहे मागच्या पंचवार्षिक मध्ये सर्वपक्षीय नेत्यांनी पाचपुते यांच्या विरोधात वज्रमूठ बांधली होती परंतु यावेळी मात्र कायमच या पक्षातुन त्या पक्षात उड्या मारणार्या नागवडे न विरोधात सर्वच पक्ष्यांचे नेते उमेदवारीच्या रिंगणात उतरले आहेत एक प्रकारे नागवडे यांना चांगलेच खिंडीत पकडले आहे माजी आमदार राहुल जगताप यांनाच मतदारांकडून पहिली पसंती मिळत आहे जरी जगताप अपक्ष लढले तरी विजयी खेचून आणण्याची ताकद जगताप यांच्या मध्ये नक्कीचं आहे कारणं त्यांना देशाचे नेते शरदचंद्र पवार यांचे आशिर्वाद आहेत उमेदवारी मिळवून सुद्धा नागवडे चांगलेच अडचणीत सापडले आहेत त्या मुळे नागवडे यांची उमेदवारी निश्चितच आघाडीच्या साजन पाचपुते वगळता एकाही नेत्याच्या मनाला रुचलेली नाही असंच दिसत आहे एकंदरीत पाहता नागवडेंन विरोधी आघाडी असंच चित्र सध्या तरी संपूर्ण तालुक्यात दिसत आहे.

# दौंडच्या कंन्येचं जगात कौतुक ;विमानातील १४० प्रवाशांचे वाचवले प्राण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दौंड तालुक्यातील कुसेगाव येथील मैत्रेयी शितोळे एअर इंडिया मध्ये पायलट आहे.तिरुचिरापल्ली येथील विमानतळावरून शारजासाठी १४० प्रवासी घेऊन विमान निघाले होते. विमानाने ३६ हजार फुटांवर उड्डाण घेतले होते.यावेळी विमानात तांत्रिक बिघाड झाला.हि बाब प्रवाशांच्या लक्षात आल्यानंतर प्रवासी घाबरले.दरम्यान, विमानातील मुख्य पायलट व को पायलट मैत्रेयी शितोळे यांनी अत्यंत शिताफीने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग केले.विमान सुखरूप लँडिंग झाल्यावर



विमानातील प्रवाशांचा जीव भांड्यात पडला.या घटनेनंतर दौंड तालुक्यातील लेकीचं भारतासह जगात कौतुक होऊ लागले. दौंड शहरातील दत्तपीठ मंदिराकडून यावेळी धाडसी कन्या मैत्रेयी शितोळे हिचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.तसेच श्री गजानन जेष्ठ नागरिक संघाकडून सन्मान करण्यात आला.यावेळी दत्तपीठ मंदिराचे प्रमुख विश्वस्त बुवा सावंत,नंदू पवार,विलास बर्वे,निलेश सावंत,अशोक गायकवाड,श्री पंडित,अर्चना साने,शशिकला सावंत, अलांकृता सावंत वृत्तवेध न्यूज सतीश थोरात,राजू बारवकर हनुमान लांडगे, श्याम वाघमारे,दिक्षित देशपांडे,उबाळे सर,पाठक उपस्थित होते.

# समाजांच्या प्रलंबित मागण्याशी जो उमेदवार कटिबद्ध त्यांच्यासोबत समाज

## मातंग समाजाच्या बैठकीत समाज बांधवांचा एकमुखी ठराव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

या देशातील मतदान प्रक्रिया जेव्हापासून सुरू झाली तेव्हापासून मातंग समाजाला कोणत्याही पक्षाच्या नेत्याकडून मदत झाली नाही असा अनेक कार्यकर्त्यांनी रोष व्यक्त करीत होत असलेल्या या विधानसभा निवडणुकीत मातंग समाजाच्या मागण्या संदर्भात जो उमेदवार कटिबद्ध राहील त्यांच्यासोबत समाज उभा राहील असा एकमुखी ठराव पारित करीत कोर कमिटीतून लवकरच निर्णय घेण्यात येईल असे अनेकांनी आयोजित बैठकीत सांगितले आहे.

नायगाव विधानसभा मतदारसंघातील कोणत्या पक्षांच्या उमेदवारासोबत समाज एकजुटीने उभा राहावा यावर आपले मत काय असेल हा विषय घेऊन नायगाव शहरातील उद्योजक कैलाश भालेराव यांच्या निवासस्थानी जिल्हा परिषदेची माजी सदस्य भाऊसाहेब भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली मातंग समाजातील प्रमुख व्यक्ती आणि कार्यकर्ता यांची बैठक आयोजित केलेल्या वेळी राजेश मनुरे, नामदेव सोनकांबळे, धर्माबाद सरपंच संघटनेचे अध्यक्ष निदानकर,अशोक कुदळेकर, सरपंच भंडारे उमरी, सरपंच दत्तात्रय आईलवार, उत्तमराव गवाले,संजय भांगे, कैलास भालेराव,शंकर गायकवाड,गंगाधर कोतेवार, रणजीत गोरे, जीवन वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सत्यशोधक डॉ. अण्णाभाऊ



साठे यांच्या प्रतिमेस अभिवादन करून बैठकीतील चर्चा सत्रात अनेकांनी आपले मत मांडले गेल्या अनेक वर्षापासून समाजातील विविध संघटनेचे कार्यकर्ते यांनी अ ब क ड वर्गीकरण करून मातंग समाजाला आरक्षण द्यावे, सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा,नरसी येथील चौकात अण्णाभाऊ साठे चा बसविण्यात आलेला पुतळा तो काढण्यात आला तो बसविण्यात यावा अशा अनेक समाज हितांच्या मागण्यासाठी आंदोलन केली पण कोणताही आजवर नेता या मागण्या गांभीर्याने लक्षात घेतलेले नाहीत म्हणून या समाजाच्या मागण्या संदर्भात जो उमेदवार कटिबद्ध राहील त्यांच्यासोबत समाज राहील याबाबत लवकरच कोर कमिटीतून नायगाव उमरी धर्माबाद या तीन तालुक्यातील समाजाचा निर्णय घेऊन आपली भूमिका ठरविण्यात येईल असा एकजुटीचा निर्धार करून सदर बैठकीत मातंग समाजाने वज्रमुठ बांधली आहे. यावेळी दतराम बैलकवाड, रामदास कांबळे,पुनमभाऊ धमनवाडे, परमेश्वर वाघमारे, बालाजी वाघमारे,दिगंबर झुंजारे, अशोक वाघमारे,विश्वंभर धसाडे, संजय गायकवाड यासह अनेक समाज बांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904